महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ २२ मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३२३ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पत्रकार हवे आहेत**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

## अकरावी ऑनलाईन प्रवेश

# पहिल्याच दिवशी सर्व्हर डाऊन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता :**

राज्यात अकरावी प्रवेशाची ऑनलाइन प्रक्रिया आजपासून (21 मे) सुरू झाली आहे. सकाळी 11 वाजल्यापासून ही प्रक्रिया सुरू होण्याची अपेक्षा होती. विद्यार्थ्यांना आजपासून कॉलेज पसंतीक्रम आणि प्रवेश अर्ज ऑनलाइन भरता येणार असल्याचं सांगण्यात आलं होतं. मात्र, पहिल्याच दिवशी शिक्षण मंडळाची वेबसाईट क्रॅश झाली आहे. संकेतस्थळ उघडताच अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होत असून अनेकांचं लॉगिन होत नाहीय. तर काही ठिकाणी भरलेली माहिती सेव्ह होत नसल्यामुळे अकरावी प्रवेशाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना अर्ज भरताना मोठ्या अडचणींचा सामना करावा



लागत आहे. अर्ज प्रक्रियेचा पहिलाच टप्पा रखडल्याने पालकांसह विद्यार्थ्यांचा मनस्ताप वाढलाय. शिक्षण विभागाकडून या अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू असून, प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरळीत होईल, असं शिक्षण संचालनालयाने स्पष्ट केलं आहे.

### यंदा पहिल्यांदाच संपूर्ण राज्यात ऑनलाइन पद्धतीनं प्रवेश प्रक्रिया

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या वेबसाईट मध्ये तांत्रिक अडचणी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात अडचणी येत आहेत.अकरावी प्रवेश प्रक्रिया यंदा पहिल्यांदाच संपूर्ण राज्यात ऑनलाइन पद्धतीनं राबविण्यात येतेय. त्यामुळं एका अर्जातच राज्यभरातील महाविद्यालयांतील प्रवेशाचा पर्याय उपलब्ध झालाय.

मात्र, पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेशाच्या संकेतस्थळावर तांत्रिक अडचणी येत असल्याने विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करता येत नाहीये. यावर शिक्षण संचालनालायकडून ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरळीत करण्यासंदर्भात काम सुरू आहे विद्यार्थ्यांना आजपासून कॉलेज पसंतीक्रम नोंदवून ऑनलाइन अर्ज भरता येणार होता. मात्र संकेतस्थळ वारंवार डाऊन होत असल्याने विद्यार्थ्यांचे लॉगिन होत नाहीये, भरलेली माहिती सेव्ह होत नाहीये आणि अर्ज प्रक्रियेचा पहिलाच टप्पा रखडला आहे. ही समस्या केवळ विद्यार्थ्यांपुरती मर्यादित नसून, महाविद्यालयांतील नोंदणीसाठी जबाबदार कर्मचाऱ्यांनाही तांत्रिक अडथळ्यांमुळे त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार पालकांसह विद्यार्थी करत आहेत. परिणामी, पहिल्याच दिवशी अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे.

### ठाणे जिल्ह्यात 454 महाविद्यालये प्रवेश प्रक्रियेत सहभागी

मागील आठवड्यात दहावीचा निकाल जाहीर झाला. यामध्ये ठाणे जिल्ह्याचा एकूण निकाल ९५.५७ टक्के इतका लागला. यात सर्वाधिक निकाल हा मुलींचा असून ९६.६९ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या. त्याचप्रमाणे ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वाधिक आहे. आजपासून अकरावी प्रवेश प्रक्रियेला सुरूवात झाली. ठाणे जिल्ह्यातून एकूण ४५४ कनिष्ठ महाविद्यालये या प्रवेश प्रक्रियेत सहभागी झाले आहेत. उत्तम गुण मिळवत पसंतीचे महाविद्यालये मिळावे अशी सर्वांची इच्छा असते. परंतू, महाविद्यालयातील उपलब्ध जागांनुसार गुणवत्तेच्या आधारे प्रवेश प्रक्रिया पार पडत असते. त्यामुळे पसंतीचे महाविद्यालय मिळणार की नाही याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष असते. आजपासून या प्रवेश प्रक्रियेला सुरूवात झाली. विद्यार्थी अधिकृत वेबसाईटवर प्रवेश प्रक्रियेसाठी नोंदणी करण्यास तयार होते. मात्र, अचानक वेबसाईटचे सर्व्हर डाऊन झाली असून प्रवेश प्रक्रिया ठप्प झाल्याचे दिसून आले. यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.




# अवकाळी पावसामुळे खरीपाच्या पेरण्या संकटात?



> हवामान विभागाने येत्या ७ जून रोजी राज्यात मॉन्सूनचा अंदाज वर्तविला आहे. त्याअनुषंगाने बियाणे केंद्रांमध्ये भात बियाणी उपलब्ध झाली आहेत.
> – ज्ञानदेव शिंदे, कृषी अधिकारी, भिवंडी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**भिवंडी, ता. २१**

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर अवकाळी पावसामुळे शेतकरी संभ्रमात पडला आहे. एकीकडे मॉन्सूनपूर्व पावसाने तडाखा दिला आहे, तर दुसरीकडे रब्बी हंगामाच्या भातशेतीसह भाजीपाला लागवडीची नासधूस केली आहे.

भातशेतीचाही हंगाम जवळ आला आहे. मागील दोन वर्षापासून ऐन मॉन्सूनमध्ये वरुणराजाने दडी मारली. या वर्षी ऐन उन्हाळ्यात अवकाळी जोरदार कोसळत आहे. मंगळवारी (ता. २०) सायंकाळी विजेच्या कडकडाटासह जोरदार पावसाने हजेरी लावली. दरम्यान, ऐन खरीप हंगामात पावसाने दडी मारली तर मात्र शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे.

सद्यःस्थितीत खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी पावसाचा लपंडाव पाहता मशागतीच्या कामांना पूर्णविराम दिल्याचे दिसत आहे.

**भातपिकाचे क्षेत्रफळ**

भिवंडी तालुका कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तालुक्यात भातपिकाचे क्षेत्रफळ १६,६८९ हेक्टर आहे. यामध्ये हळव्या भात प्रकाराची शेती चार हजार १७२.२५ हेक्टर तर निमगरवा शेती नऊ हजार १७८.९५ हेक्टर क्षेत्रात आहे. गरवा शेती तीन हजार ३३४.८० क्षेत्रात होत आहे. भिवंडी तालुक्यातील एकूण रोपवाटिका क्षेत्र १,६६८.९० हेक्टर इतकी असून, या वर्षी भातशेतीचा टक्का मोठ्या प्रमाणात वाढेल, असा अंदाज कृषी विभागाने वर्तवला आहे. दुसरीकडे हवामान विभागाच्या मॉन्सूनच्या अंदाजाने शेतकऱ्यांना यावर्षी सुगीचे दिवस येणार असल्याचीही शक्यता आहे.

# शहापूर तालुक्यात वीस तास बत्ती गूल

## महावितरणचा सावळा गोंधळ



> मागील काही दिवसांपासून सातत्याने विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने संगणक व इतर यांत्रिक वस्तूंमध्ये बिघाड झाल्याच्या घटनांसह घरगुती विद्युत उपकरणे देखील नादुरुस्त होत आहेत. महावितरणच्या कार्यालयात दूरध्वनीची सुविधा उपलब्ध नसल्याने विजेच्या समस्यांबाबत तक्रार कोणाकडे करावी असा प्रश्न येथील नागरिकांना पडला आहे. वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे पाणी योजनेवरही विपरीत परिणाम होत असून कृत्रिम पाणीटंचाईचा सामना नागरिकांना सहन करावा लागत आहे.

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

शहापूर : शहापूर येथील गोपाळनगर भागात मंगळवारी रात्री विजेच्या खांबावर झाड उन्मळून पडल्याने शहापुरातील बहुतांश भागात तब्बल वीस तास विद्युत पुरवठा खंडीत झाला होता. दिवसभर उन्हाची दाहकता आणि रात्री वीज गायब झाल्याने प्रचंड उकाड्याने नागरिक हैराण *झाले. रात्रभर वीजे अभावी आणि डासांचा त्रास सहन करत नागरिकांना रात्र जागूनच काढावी लागली.

वारंवार विद्युत पुरवठा गायब होत असल्याने बँकेचे कामकाज, शासकीय कार्यालये यांसह व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर परिणाम झाला. लघु उद्योजकांसह व्यापारी वर्गातून महावितरणच्या भोंगळ कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त केला. तालुक्यातील ग्रामीण भागात मागील काही दिवसांपासून पाऊस पडत आहे. मंगळवारी रात्री विजांच्या कडकडाटासह पाऊस पडला होता. त्यामुळे गोपाळनगर येथील एक झाड उन्मळून विजेच्या खांबावर पडले. त्यामुळे शहापूर येथील अनेक भागात तब्बल २० तास विद्युत पुरवठा खंडीत झाला होता.

विद्युत पुरवठा खंडीत झाल्याने नागरिकांना रात्र जागून काढावी लागली. त्यातच, डासांमुळे लहान बालके, वृद्ध, रुग्णांना त्रास सहन करावा लागला. शहापूर भागात लघु उद्योग आहेत. त्या उद्योगांवरही त्याचा परिणाम झाला होता. व्यापाऱ्यांनीही नाराजी व्यक्त केली. बुधवारी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास येथील विद्युत पुरवठा सुरळीत झाला.

गेल्याकाही दिवसांपासून झाडे उन्मळून पडल्यामुळे विजेच्या तारा तुटण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे वारंवार विद्युत पुरवठा खंडीत होऊन नागरिकांचे हाल होत आहेत. महावितरणकडून दरवर्षी विद्युत पुरवठा खंडित करून दुरुस्तीची कामे केली जातात. असे असताना पावसाळ्यात सातत्याने विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रकार होत असल्याने दुरुस्तीच्या कामाविषयी नागरिकांकडून प्रश्नचिन्ह निर्माण होत आहेत.

# कल्याण इमारत दुर्घटना मृतांच्या कुटुंबियांना पाच लाखांची मदत




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली :** कल्याणमधील धक्कादायक इमारत दुर्घटनेने संपूर्ण शहराला हादरवून सोडले आहे. या दुर्घटनेत इमारतीचे छत कोसळून सहा नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र दुःख व्यक्त करत मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. तसेच या अपघातग्रस्त कुटुंबीयांच्या दुःखात शासन आणि जनतेसोबत आपणही सहभागी असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाख रुपयांचे अर्थसहाय्य देण्याची घोषणा केली आहे. हे आर्थिक सहाय्य शासनाच्या आपत्कालीन निधीतून तातडीने वितरित केले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर जखमींच्या उपचारासाठी आवश्यक ती सर्व वैद्यकीय मदत तत्काळ पुरविण्यात यावी, अशा सूचना त्यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या आहेत. ही दुर्घटना अतिशय वेदनादायक असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी बांधकामांची तपासणी करणे आणि जीर्ण इमारतींबाबत तातडीची कार्यवाही करणे गरजेचे आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. त्यांनी स्थानिक प्रशासनाला योग्य ती मदत करण्याचे निर्देश दिले असून, अपघाताच्या कारणांची सखोल चौकशी करण्याचे आदेशही दिले आहेत.

सविस्तर पान : 02 वर




## धोकादायक इमारती कोसळून जिवीत व वित्तहानी होऊ नये याची दक्षता घेण्यात यावी !

महापालिका आयुक्त अभिनव गोयल

# जिल्हा प्रशासनाची सतर्कता शहापुरात टळला बालविवाह

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

**ठाणे :** शहापूर तालुक्यातील वेळुक कातकरी वाडी येथे एका १७ वर्षाच्या मुलीचा बालविवाह रोखण्यास जिल्हा प्रशासनाला यश आले आहे. संबंधित मुलगी राहत असलेल्या वाडीतच राहणाऱ्या एका मुलासोबत तिचे प्रेमसंबंध होते. गावात बदनामी होऊ नये या भीतीने आणि दोन्ही मुलांच्या हट्टापायी दोन्ही कुटुंबीयांनी समंतीने या विवाहाचा घाट घातला. मात्र चाईल्ड लाईन वरून या लग्नाची माहीत जिल्हा प्रशासनाला मिळाली या माहितीवरून अधिकारी धनश्री साळुंखे यांनी घटनास्थळी धाव



घेऊन हा बालविवाह रोखला.

चाईल्ड हेल्पलाईन वरून जिल्हा प्रशासनाला बालविवाह होत असल्याच्या अनेक तक्रारी आणि माहिती येत असते. याच माहितीच्या आधारे स्थानिक जिल्हा प्रशासनकडून घटनास्थळी धाव घेऊन बालविवाह रोखण्यात येतो. याच पद्धतीने शहापूर तालुक्यातील वेळुक कातकरी वाडी येथे एका १७ वर्षाच्या मुलीचा बालविवाह रोखण्यास जिल्हा प्रशासनाला यश आले आहे. या वाडीत राहणाऱ्या संबंधित मुलीचे घराजवळ राहणाऱ्या एका बालिक मुलाबरोबर प्रेमाचे सूत जुळले. तर मुलगी काही दिवस मुलाच्या घरी राहण्यासाठी देखील गेली. हे सर्व प्रकार थांबावे आणि गावात अधिक बदनामी होऊ नये म्हणून दोन्ही कुटुंबीयांनी संगनमताने मुलीचा बालविवाह करण्याचा घाट घातला.

मात्र लग्नाच्या दिवशी चाईल्ड हेल्पलाईनला एका सामाजिक संस्थेच्या माध्यमातून लग्नाची माहिती मिळाली. याची माहिती मिळताच बालविकास प्रकल्प अधिकारी धनश्री साळुंखे, पोलीस निरीक्षक सुरेश गावित आणि सेवा सामाजिक संस्थेचे सुरेखा विशे यांनी घटनास्थळी धाव घेऊन बालविवाह रोखला. तर मुलीला बालकल्याण समिती समोर हजर करण्यात येणार असून तिला सध्या उल्हासनगर येथील एका वसतिगृहात ठेवण्यात आले आहे. तर दोन्ही कुटुंबीयांविरोधात बालविवाह कायद्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

# आता उल्हासनगरवर सीसीटीव्हीची नजर

## - पोलिस उपायुक्त सचिन गोरे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर, ता. २० :** शहरात गुन्ह्यांच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहे. त्यामुळे उल्हासनगरवर नजर ठेवण्यासाठी ९८५ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे काम जलदगतीने सुरू झाले आहेत, अशी माहिती पोलिस उपायुक्त सचिन गोरे यांनी दिली आहे.

राज्य सरकारच्या गृहविभागाने ५ जानेवारी २०२४ मध्ये जारी केलेल्या जीआरमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने ठाणे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या आदेशान्वये उल्हासनगरमध्ये ९८५ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येत आहे. सीसीटीव्हीसाठी भूमिगत वाहिन्या टाकण्यासाठी आणि खांब बसवण्यासाठी खोदकाम करणे आवश्यक होते.

मागच्या वर्षी तशी खोदकामाची परवानगी महापालिकेचे तत्कालीन प्रभारी आयुक्त जमीर लेंगरेकर यांनी दिली होती. त्यानुसार ठाणे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या आदेशान्वये बिनतारी संदेश विभागाचे सहाय्यक पोलिस आयुक्त प्रदीप कन्नलू यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक मिलिंद बिरारे यांच्या देखरेखीत खोदकामाची प्रक्रिया हाताळण्यात आली आहे. यासाठी ३९८ खांब बसवण्याचे आणि त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.









# गीतासार



### अध्याय ११
### विश्वरूपदर्शनयोगः

आख्याहि मे को भवानुग्ररूपो नमोऽस्तु ते देववर प्रसीद । विज्ञातुमिच्छामि भवन्तमाद्यं न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम् ॥ ११-३१ ॥

मला सांगा की, भयंकर रूप धारण करणारे आपण कोण आहात? हे देवश्रेष्ठा, आपणास नमस्कार असो. आपण प्रसन्न व्हा. आदिपुरुष अशा आपल्याला मी विशेष रीतीने जाणू इच्छितो. कारण आपली ही करणी मला कळत नाही. ॥ ११-३१ ॥

श्रीभगवानुवाच कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो लोकान्समाहर्तुमिह प्रवृत्तः । ऋतेऽपि त्वां न भविष्यन्ति सर्वे येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः ॥ ११-३२ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, मी लोकांचा नाश करणारा वाढलेला महाकाल आहे. यावेळी या लोकांच्या नाशासाठी मी प्रवृत्त झालो आहे. म्हणून शत्रुपक्षीय सैन्यात जे योद्धे आहेत, ते सर्व तुझ्याशिवायही राहणार नाहीत. म्हणजेच तू युद्ध केले नाहीस, तरी या सर्वांचा नाश होणार आहे. ॥ ११-३२ ॥


तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व जित्वा शत्रून्भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम् । मयैवैते निहताः पूर्वमेव निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ॥ ११-३३ ॥

म्हणूनच तू ऊठ. यश मिळव. शत्रूंना जिंकून धनधान्यसंपन्न राज्याचा उपभोग घे. हे सर्व शूरवीर आधीच माझ्याकडून मारले गेलेले आहेत. हे सव्यसाची अर्जुना, तू फक्त निमित्तमात्र हो. ॥ ११-३३ ॥

द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च कर्णं तथान्यानपि योधवीरान् । मया हतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा युध्यस्व जेतासि रणे सपत्नान् ॥ ११-३४ ॥

द्रोणाचार्य आणि पितामह भीष्म तसेच जयद्रथ आणि कर्ण, त्याचप्रमाणे माझ्याकडून मारल्या गेलेल्या इतरही पुष्कळ शूर योद्ध्यांना तू मार. भिऊ नकोस. युद्धात तू खात्रीने शत्रूंना जिंकशील. म्हणून युद्ध कर. ॥ ११-३४ ॥

## आरोग्य
# चहा पिताना होणाऱ्या चुका



**उन्हाळ्यात किंवा सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी चहा पिणे**

रिकाम्या पोटी चहा घेतल्यास ॲसिडिटी, गॅस, जळजळ आणि मलावरोध (कॉन्स्टिपेशन) होऊ शकतो. त्यामुळे चहा पिण्याआधी थोडं गरम पाणी किंवा फळं खाणं फायदेशीर ठरतं.

**अती प्रमाणात चहा पिणे**

दिवसभरात अनेकदा चहा पिणं, विशेषतः 4-5 वेळा किंवा त्याहून अधिक, शरीरात कॅफीनचं प्रमाण वाढवतं. यामुळे झोपेत अडथळा, अस्वस्थता आणि थकवा येऊ शकतो. दिवसाला 2 कपपिक्षा अधिक चहा टाळावा.

**जास्त वेळ उकळलेली किंवा फार गडद चहा पिणे**

काही लोक चहा चांगला सुगंध येईपर्यंत 10-15 मिनिटं उकळतात. यामुळे त्यातील टॅनिन्स आणि कॅफीन वाढते, जे पचनास त्रासदायक ठरते. चहा मध्यम उकळलेला आणि सौम्य ठेवणं उत्तम.

**खाण्यानंतर लगेच चहा पिणे**

अन्नानंतर लगेच चहा घेतल्यास अन्नातील लोह (आयरन) आणि इतर पोषक घटक शोषले जात नाहीत. त्यामुळे जेवल्यानंतर किमान 30-45 मिनिटांनीच चहा प्यावा.

**चहामध्ये जास्त साखर घालणे**

जास्त गोड चहा प्यायल्यास रक्तातील साखरेचं प्रमाण वाढतं, लठ्ठपणा आणि मधुमेहाचा धोका वाढतो. शक्य असल्यास कमी साखर वापरा किंवा त्याऐवजी मूळ, मध यांचा वापर करा.

### ठाणे जिल्हा माहिती कार्यालयाच्या
# ‘टेरेस गार्डन’ निर्मितीचे काम जलदगतीने सुरु

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**ठाणे :** जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे, वेसाक इंडियाच्या सहकार्याने आणि ठाणे येथील आसरा फाउंडेशनच्या पाठिंब्याने, जिल्हा माहिती कार्यालय आणि एसबीआय शाखेच्या छतावर आणि समोरील भागात, एक मॉडेल टेरेस गार्डन तयार करण्याचे काम सुरू आहे.

या उपक्रमाचा शुभारंभ काही दिवसांपूर्वीच जिल्हाधिकारी महोदयांच्या स्वीय सहाय्यक स्व.पल्लवी सरोदे यांच्या स्मरणार्थ वॉटर लिली व कमळाचे रोप लावून करण्यात आला. याचा पुढील टप्पा म्हणून दि.30 एप्रिल 2025 रोजी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने यांच्या हस्ते “टेरेस गार्डन” उपक्रमाच्या निर्मिती प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला.
हे केवळ एक उद्यान नसून सामूहिक दृष्टिकोन, जबाबदार प्रशासन आणि सामुदायिक नेतृत्व काय साध्य करू शकते याचे एक प्रतिक आहे. याचा हेतू शहरी प्रशासकीय वातावरणात हरित, कार्यात्मक आणि प्रेरणादायी जागा निर्माण करणे, हा आहे.

हा प्रकल्प संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी (SDGs) थेट जुळतो, ज्यामध्ये पुढील बाबी समाविष्ट आहेत:
- SDG 11 – शाश्वत शहरे आणि समुदाय
- SDG 12 – जबाबदार उपभोग आणि उत्पादन
- SDG 13 – हवामान कृती
- SDG 3 – चांगले आरोग्य आणि कल्याण
- SDG 17 – उद्दिष्टांसाठी भागीदारी

या उपक्रमाची वैशिष्ट्ये:
- कचऱ्याचे अपसायकलिंग: वनस्पती-अनुकूल, शाश्वत वाढणारे माध्यम तयार करण्यासाठी औद्योगिक प्रक्रियांमधून पाइनवुड फळया, सिंडर (जळलेला कोळसा) आणि तेलबियांचे अवशेष वापरणे.
- पुनर्प्राप्त लाकडापासून बनवलेले प्लास्टिक-मुक्त, उष्णता-इन्सुलेटेड कंटेनर, टेरेसची पर्यावरणीय आणि थर्मल कार्यक्षमता दोन्ही वाढवतात.
- नैसर्गिक डास-प्रतिरोधक वनस्पतींची लागवड, वेक्टर-जनित रोगांचा धोका कमी करून सार्वजनिक आरोग्यास सक्रियपणे समर्थन देणे.
- सामुदायिक संवाद आणि प्रशिक्षण क्षेत्राची निर्मिती, कार्यशाळांसाठी जागा, हरित शिक्षण आणि कचरा-ते-मूल्य पद्धतींबद्दल जागरूकता प्रदान करणे.

शासकीय संस्था कशा प्रकारे उदाहरणाद्वारे नेतृत्व करू शकतात हे दाखवण्याची संधी आहे, लोकांना हे सोदाहरण दाखवून देण्याची वेळ आली आहे की, वातावरणीय बदलाची जबाबदारी आपल्यापासून, आपल्या घराच्या/कार्यालयाच्या छतावरून सुरू होते, असा प्रोत्साहनात्मक संदेश देण्यासाठी आम्ही हे पाऊल उचलले आहे. जागतिक पर्यावरण दिनाचे स्मरण/उपस्थिती म्हणून दि.05 जून 2025 पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे आमचे ध्येय असून ही अंतिम मुदत केवळ एका तारखेचेच नव्हे तर बदलाच्या सामायिक वचनबद्धतेचे प्रतिक आहे, असे जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांनी सांगितले.

परिवर्तनाच्या या प्रवासात आपण सर्वजण एकत्र येवू या. हे “टेरेस गार्डन” केवळ वनस्पतींनीच नव्हे तर ठाणे, महाराष्ट्र आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी एका चांगल्या, हिरवेगार, अधिक जबाबदार उद्याच्या आश्वासनाने फुलवू या, असे आवाहनही त्यांनी केले आहे. तसेच जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, पोलीस अधीक्षक डॉ.डी.स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक अभिषेक पवार, स्टेट बँक ऑफ इंडिया चे वरिष्ठ अधिकारी यांच्यासह जिल्हा प्रशासनातील विविध विभागांचे कार्यालय प्रमुख, जिल्ह्यातील सर्व प्रसारमाध्यमे हा उपक्रम साकारण्यासाठी देत असलेल्या प्रोत्साहन आणि सहकार्याबद्दल जिल्हा माहिती अधिकारी श्री.सानप यांनी सर्वांचे विशेष आभार मानले आहेत.

# अतिधोकादायक/धोकादायक इमारती कोसळून जिवीतहानी होऊ नये याची दक्षता घ्यावी
## - महापालिका आयुक्त अभिनव गोयल



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** अतिधोकादायक/धोकादायक इमारती कोसळून जिवीत व वित्तहानी होणार याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज त्यांच्या दालनात आयोजिलेल्या बैठकीत सर्व प्रभागांच्या सहा.आयुक्तांना दिले.

यापूर्वी दि. 5 मे रोजी महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी घेतलेल्या मान्सुनपूर्व आपत्कालीन बैठकीत या सूचना सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिलेल्या होत्या. काल कल्याण पूर्व येथे घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज सकाळी 9.30 वा. सर्व अधिकाऱ्यांची बैठक घेवून आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या कार्यवाहीचा आढावा घेतला.

आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन विभागाची भूमिका महत्वाची असते, त्यामुळे अग्निशमन विभागाच्या कामकाजाबाबत SOP तयार करावी, आपत्कालीन कक्षात नेमणूक असणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्वरीत प्रशिक्षण देण्यात यावे. त्याचप्रमाणे आपत्कालीन परिस्थितीमध्ये लागणाऱ्या सर्व शासकिय यंत्रणांतील निगडीत अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या दूरध्वनी क्रमांकाची यादी अद्यायावत ठेवावी, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

सर्व प्रभागांचे सहा.आयुक्त यांनी आपापल्या प्रभागातील शेल्टर होममध्ये विद्युत व्यवस्था, पाणी, शौचालय इ. सुविधा आहेत, याची खातरजमा करावी. महापालिका क्षेत्रातील नाले सफाई तसेच लहान गटारांची सफाई व्यवस्थित झाली असल्याची खातरजमा संबंधित अधिकाऱ्यांनी करावी. आरोग्य विभागाने आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना सेवा देण्याच्या दृष्टीकोनातून प्रत्येक प्रभागासाठी एका समन्वयक अधिकाऱ्याची नेमणूक करावी. बांधकाम विभागाने महापालिका परिक्षेत्रातील "क्रीटीकल पॉईंट" संदर्भात काय उपाययोजना लागणार आहेत, त्या अनुषंगाने कार्यवाही करावी. नोडल अधिकाऱ्यांनी आपआपल्या प्रभागात "मॉक ड्रील" घ्यावे, अशा अनेक सूचना महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी या बैठकीत अधिकारी वर्गास दिल्या आणि आपत्कालीन कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांनी कर्तव्यात कसूर अथवा निष्काळजीपणा केल्यास संबंधितांच्या निलंबनाचा प्रस्ताव सादर करणेबाबतच्या सूचनाही त्यांनी या बैठकीत दिल्या.

# शालेय पुस्तके रद्दीत देवु नका, ती होतकरू विद्यार्थ्यांच्या कामी येतील
## डोंबिवलीत शिवसेना ठाकरे गट उपशहर प्रमुख संजय पाटील यांचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**डोंबिवली :** गरीब गरजू विद्यार्थ्यांना पुस्तक रूपाने मदतीचा हात देता येतो त्यासाठी नजर तीक्ष्ण असावी लागते. डोंबिवलीत शिवसेना ठाकरे गट उपशहर प्रमुख संजय पाटील यांच्या आवाहनाला डोंबिवलीकरांनी उत्तम प्रतिसाद दिला असून डोंबिवलीकरांनी त्यांच्याकडील जुनी शैक्षणिक पुस्तके पाटील यांच्या स्वाधीन केली आहेत. ही पुस्तके आता काही दिवसात गरीब गरजू विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहेत. परिणामी त्या विद्यार्थांना पुस्तकांसाठी पैसे मोजावे लागणार नाहीत.

मार्च - एप्रिल महिन्यात विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपल्यानंतर संजय पाटील यांनी शहरवासीयांना एक आवाहन केले होते. त्यांनी या आपल्या आवाहनात म्हटले होते की, सर्व विद्यार्थ्यांच्या शालेय परिक्षा आता संपत आल्या आहेत.

महाग दरात खरेदी केलेली पुस्तके रु. 20/- किलो दराने रद्दीत देऊ नका. तुमच्या जवळ जी काही पुस्तके आहेत त्यांची यादी तुम्ही आम्हाला पाठवा म्हणजे ती पुस्तके कोणा गरजूंना कामाला येतील व त्यांच्या पालकांना होणारा शैक्षणिक भुर्दंड काही प्रमाणात कमी होईल. नकळत निसर्गाचे संवर्धन होईल. रू1000/- ची पुस्तके रू 20/- च्या रद्दीत विकली गेली तर समजा आपण शिक्षित होऊन सुद्धा अशिक्षित आहोत. एक हात मदतीचा तुमचा आणि आमचा मिळून एक चांगले कार्य करू.

संजय पाटील यांच्या आवाहनुसार त्यांच्याकडे के.जी. टू पी.जी. स्वरूपाची जुनी शैक्षणिक पुस्तके लोक घेवून येत आहेत. त्यांच्या कार्यालयात आता पुस्तकांचा ढीग होत असून त्यांच्या या कार्याची वा ह वा होत आहे. याबाबत पाटील सांगतात, डोंबिवलीकरानी जो प्रतिसाद दिला त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. आता ही पुस्तके योग्य गरजू विद्यार्थ्यांना नक्की मिळतील.

# शंभुदुर्ग संघटनेच्या वतीने शंभूराजे जयंती साजरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**शहापूर :** शहापूर तालुक्यातील वासिंद येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली, जयंती उत्सहाच्या निमित्ताने संपूर्ण वासिंद शहरात भव्य धर्मजागरण रॅली काढण्यात आली या रॅलीत परिसरातील शेकडो शिवभक्तांनी सहभाग घेऊन रॅलीत धर्मांतर बंदी कायदा करावा, लवजिहाद कायदा करावा, मंदिर अधिग्रहण कायदा रद्द करावा या मागण्यांचे फलक झळकविले तसेच परिसरातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत धर्मजागरण सभेचे आयोजन करून शेकडो शिवभक्तांना मार्गदर्शन करण्यात आले या कार्यक्रमात सद्गुरू आलोकनाथ महाराज, शिवमंदिर निर्माते राजू भाऊ चौधरी, जीवनदीप शिक्षण संस्था रवींद्रजी गोदविंदे, राजाभाऊ चौधरी उद्योजक अनिल मानिवडे, विलास पाटील विभागातील इतर मान्यवर उपस्थित होते.

# मुंबईसह ठाणे, पालघर आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार पाऊस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मुंबईसह ठाणे, पालघर आणि मध्य महाराष्ट्रात बुधवार आणि गुरुवार हे दोन्ही दिवस मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. यावेळी काही भागात जोरदार वाऱ्यांसह पावसाची शक्यता आहे. तर काही भागात मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन हवामान विभगाने केले आहे.

दरम्यान, मुंबईसह राज्याच्या काही भागात पुढील काही दिवस पडणारा पाऊस हा वळिवाचा पाऊसच आहे. त्याला मोसमी पाऊस म्हणता येणार नसल्याचे हवामान विभागाकडून स्पष्ट करण्यात आले. मुंबई प्रादेशिक हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार पूर्व-मध्य अरबी समुद्रात कर्नाटकच्या किनाऱ्यालगत बुधवारी चक्राकार वाऱ्यांची स्थिती तयार होणार आहे. त्याचाच परिणाम म्हणून गुरुवारी कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होणार आहे आणि त्याचा प्रभाव महाराष्ट्रावर पडणार आहे. मुंबई, दक्षिण कोकण आणि मध्य महाराष्ट्रावर याचा प्रभाव राहील. त्यामुळे बुधवारपासून शनिवारपर्यंत काही ठिकाणी मेघगर्जनेसह मुसळधार पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. या कालावधीत काही भागात वाऱ्याचा वेग ताशी ३० ते ४० किमी इतका राहील. तर, कही ठिकाणी वाऱ्याचा वेग जास्त राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

# ‘माझे वन’ नाविन्यपूर्ण योजनेचा शुभारंभ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** अलिबाग वन विभागातील अवनत वन क्षेत्राचे शासकीय निधीचा वापर न करता वनीकरण करण्यासाठी अलिबाग वन विभागाचे उप वनसंरक्षक राहुल पाटील यांच्या संकल्पनेतून “माझे वन” ही योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेचा शुभारंभ वनमंत्री श्री.गणेश नाईक यांच्या शुभहस्ते मौजे जुमापट्टी, ता. कर्जत (माथेरान परिक्षेत्र) येथील राखीव वन कक्ष क्र. 50 अ येथे 1 एकर अवनत क्षेत्रावर वृक्ष रोपण करुन आज दि. 22 मे रोजी करण्यात येणार आहे.

या योजनेमध्ये प्रत्येक कार्यरत वन कर्मचारी यांनी वन विभागाचे कार्यक्षेत्रातील वनांपैकी कोणतेही 1 एकर क्षेत्राची निवड करुन सन 2025 चे पावसाळयांत, स्वेच्छेने व स्वखर्चाने त्यांना वाटणारे वृक्षांची लागवड करावयाची आहे. तसेच निश्चित केलेल्या क्षेत्रातील वृक्षांचे संपूर्ण संरक्षण व संगोपन करण्याचे आहे. या योजनेंतर्गत वनीकरण केल्यास एकूण कार्यरत पदांप्रमाणे साधारणतः 338 एकर क्षेत्रावर सन 2025 चे पावसाळयात वनीकरण होणार आहे

"माझे वन" योजनेमुळे वनीकरणावर वैयक्तिक दृष्ट्या लक्ष दिले जाणार असल्याने, अवनत वनांचे वनीकरण होऊन वृक्षाच्छादन वाढण्यास भरीव मदत होणार आहे. वन कर्मचारी यांनी निवड केलेले अवनत 1 एकर क्षेत्रास त्यांचे स्वेच्छेने नाव देण्याची त्यांना मुभा राहणार आहे.

अलिबाग (प्रा.) वन विभागात 1 उप वनसंरक्षक, 2 सहाय्यक वनसंरक्षक, 12 वन परिक्षेत्र अधिकारी, 74 परिमंडळ अधिकारी आणि 249 नियत क्षेत्र अधिकारी अशी एकुण 338 क्षेत्रीय पदे कार्यरत आहेत.

अलिबाग वन विभागांचे कार्यक्षेत्रात अलिबाग, वडखळ, पेण, पनवेल, उरण, खालापुर, कर्जत पुर्व, कर्जत पश्चिम, माथेरान, सुधागड व नागोठणे अशी 11 परिक्षेत्र असून एकूण 1065.61 चौ.कि.मी. एवढे वनक्षेत्र आहे.

# माजी नगरसेविका खुशबू चौधरी यांचा वाढदिवस संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक 71 च्या माजी नगरसेविका खुशबू चौधरी यांचा वाढदिवस त्यांच्या कार्यालयात त्यांच्या कार्यकर्त्यांनी आणि मित्र मैत्रिणीने मोठ्या उत्साहात साजरा केला.

खुशबू चौधरी भारतीय जनता पार्टीच्या प्रभाग क्रमांक 71 माजी नगरसेविका असून त्यांना समाजकारणाची आणि राजकारणाची आवड आहे म्हणून त्यांनी अनेक लोकप्रिय उपक्रम हाती घेतले आणि पूर्ण केलेत प्रभागात काम करीत असताना अनेक समस्यांवरती मात करून नागरिकांना समजावून जनतेची कामे केली

खुशबू चौधरी यांनी प्रभागात आपले स्वतःचे प्रभुत्व आणि जनसंपर्क ठेवून सुसंवाद निर्माण केला आणि भारतीय जनता पार्टीचे विचार तत्त्व स्थानिक नागरिकांना समजावून सांगितले.

# भिवंडी महापालिकेच्या आरोग्य विभागाचा कचरा गाड्या ठेकेदाराचे ताब्यात..

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



### स्वच्छ भारत अभियान कचरा वाहू घंटागाडी अज्ञाताने जाळली.
### पालिका अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष..

**भिवंडी -** भिवंडी महानगर पालिकेच्या कारभारावर राज्य शासन व महापालिका आयुक्त प्रशासनाचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नसल्याने मोठ्या गलथान कारभार सुरू असल्याचे तक्रारी शासन दरबारी आहेत.
महापालिकेच गत महिन्यात झालेल्या आढावा बैठकीत सुरळीत काम करणे संदर्भात आयुक्तांनी सुचना देऊन सुध्दा आरोग्य विभाग प्रमुख व निरीक्षकांचा बेफिकिरीपणा वाढला आहे. कचरा ठेकेदाराचा ठेका संपुष्टात आल्यानंतर देखील ठेकेदारास देण्यात आलेली कचरा वाहू वाहन महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी परत घेतले नाही.
परिणामी दिलेल्या वाहनांपैकी एक कचरा वाहन करणारी घंटागाडी सार्वजनिक रस्त्यांवर जाळून खाक झाले आहे.
झालेल्या या गंभीर प्रकारा बाबतीत पालिका प्रशासनाकडे सामाजिक कार्यकर्तेनी तक्रारी करून सुध्दा आरोग्य अधिकाऱ्यांनी कानावर हात ठेवले असुन सर्वजण चिडीचुप आहेत. या गंभीर घटने संदर्भात पोलिसात अद्याप तक्रार न केल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त केलं जात आहे.
पालिकेने शहरातील नागरिकांकडून ओला आणि सुका कचरा उचलण्यासाठी आणि त्या कचऱ्याचे डम्पिंग ग्राउंडवर विघटन करून त्याची विल्हेवाट लावण्याचा ठेका आर अँड बी इन्फ्रा या कंपनीस देण्यात आला होता. त्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत महापालिकेस लाखो रुपये किमंतीची मिळालेली ५० इंजिन वाहने, २३ आरसी मशीन, डंपर, ट्रक इत्यादी वाहन व वस्तू पालिका प्रशासनाने कंत्राटदार कंपनीला दरमहा फक्त १ रुपयांना देण्यात आली होती.कामात हलगर्जी पणा केल्याचा ठपका ठेवत हा कचरा संकलनाचा करार रद्द (ठेका) पालिका प्रशासनाने केला होता. व घेतलेली वाहन महापालिके कडे जमा करावीत अशी सुचना दिली होती.त्यानंतर १० महिने उलटूनही महापालिकेच्या आरोग्य विभागाचा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ठेकेदाराकडून पालिकेची वाहने अद्याप परत घेतली नाही. अथवा ठेकेदारावर कोणतीही कारवाई केलेली नाही. या बाबत पालिकेचे अधिकारी स्पष्टपणे देत नसल्याची माहिती तक्रारदाराने आयुक्ताकडे केली आहे. महानगर पालिकेत सध्या प्रशासकीय कारभार सुरु आहे.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# महाडिक वाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** पेण तालुक्यातील महाडीकवाडी येथे बुधवार दिनांक २१ मे २०२५ ते २७ मे २०२५ पर्यत श्री संत सेवा मंडळ पेण यांच्या सहकार्याने गुरुवर्य ह.भ.प.कुष्णा महाराज लांबे यांचे प्रेरणेने मधुकर महाराज कालेकर, शिंदे बाबा, दिगंबर महाराज राऊत यांचे मार्गदर्शनाखाली ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अंखड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या हरिनाम सप्ताहानिमित्त सकाळी काकडा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन, हरिपाठ, किर्तन आदि कार्यक्रम ठेवण्यात आले आहेत.
बुधवार दिनांक २१/०५/२०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता ह.भ.प. शेखर महाराज कदम,नागोठणे यांचे प्रवचन, सायकांळी ५ वाजता आचार्य विनोबा भावे हरिपाठ मंडळ गागोदे बुद्रुक यांचे हरिपाठ, रात्रो ९ वाजता ह.भ.प. संजय महाराज वेळुकर,सातारा यांचे किर्तन, गुरुवार दिनांक २२/०५/२०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता ह.भ.प. ओम महाराज दळवी,मांगरुळ यांचे प्रवचन, सायकांळी ५ वाजता विठ्ठल रखुमाई हरिपाठ मंडळ विठ्ठलवाडी भाल यांचे हरिपाठ, रात्रो ९ वाजता ह.भ.प. नेहाताई भोसले यांचे किर्तन, शुक्रवार दिनांक २३/०५/२०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज पाटील,वडखळ यांचे प्रवचन, सायकांळी ५ वाजता श्री.ज्ञानेश्वर महाराज माऊली हरिपाठ मंडळ, कोलाड यांचे हरिपाठ, रात्रो ९ वाजता ह.भ.प. सुनिता ताई आंधळे यांचे किर्तन, शनिवार दिनांक २४/०५/२०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता ह.भ.प. मधुकर महाराज कालेकर,खरवई यांचे प्रवचन, सायकांळी ५ वाजता श्री अक्कादेवी हरिपाठ मंडळ सरेभाग यांचे हरिपाठ, रात्रो ९ वाजता ह.भ.प. मधुकर महाराज सायालकर यांचे किर्तन, रविवार दिनांक २५/०५/२०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता ह.भ.प. प्रणित महाराज महाब्दी,खालापुर यांचे प्रवचन, सायकांळी ५ वाजता जय गणेश हरिपाठ मंडळ धावटे यांचे हरिपाठ, रात्रो ९ वाजता ह.भ.प. रुपाली ताई सवणे यांचे किर्तन, सोमवार दिनांक २६/०५/२०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता ह.भ.प. दिगंबर महाराज राऊत पेण यांचे प्रवचन, सायकांळी ५ वाजता सामुदायिक हरिपाठ मंडळ महाडीकवाडी यांचे हरिपाठ, रात्रो ९ वाजता ह.भ.प. संतचरण बाळकुष्ण दादा वसंत गडकर महाराज कराड यांचे किर्तन, मंगळवार दिनांक २७/५/२०२५ रोजी सकाळी १० वाजता ह.भ.प. गुरुवर्य कुष्णा हरि लांबे महाराज आळंदी यांचे काल्याचे किर्तन आदी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत.

या सप्ताहा निमित्त सोमवार दिनांक २६ मे २०२५ सायकांळी ५ वाजता ह.भ.प. लांबे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दिपोत्सव साजरा करण्यात येणार आहे. मंगळवार दिनांक २७ मे रोजी सायकाळी ६ वाजता पालखी सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

# नवी मुंबई मनपा मुख्यालयात दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त प्रतिज्ञा




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटरमध्ये दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त प्रशासन विभागाचे उपआयुक्त श्री.शरद पवार यांच्यासमवेत मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.सत्यवान उबाळे, समाजविकास विभागाचे उपआयुक्त श्री.किसनराव पलांडे, लेखा अधिकारी श्री.विजय रांजणे, सहा.आयुक्त श्रीम. अलका महापूरकर, श्रीम.स्वरूपा परळीकर, श्री.अरूण पाटील, इस्टेट मॅनेजर श्री.अशोक अहिरे, प्रशासकीय अधिकारी श्री.संजीव पवार आणि उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांनी दहशतवाद व हिंसाचार विरोधी सामुहिक प्रतिज्ञा ग्रहण केली. यावेळी माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पमालिका अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

"आम्ही, भारताचे नागरिक, आपल्या देशाच्या अहिंसा व सहिष्णूतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून याव्दारे, सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तीनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करीत आहोत" अशी प्रतिज्ञा घेत महापालिका अधिकारी, कर्मचारीवृंदाने "आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही सर्व मानवजातीमध्ये शांती, सामाजिक एकोपा आणि सामंजस्य टिकवू व वर्धिष्णू करू, तसेच मानवी जीवित आणि मूल्य धोक्यात आणणा-या विघटनकारी शक्तीचा प्रतिकार करू" असा प्रतिज्ञेचा मजकूर सामुहिकरित्या म्हटला.

# योग्य पद्धतीने नालेसफाई न झाल्यास आंदोलन – मनसेचा ठामपाला इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रातील नालेसफाईची कामे संथगतीने सुरू असल्यामुळे अनेक नाले कचऱ्याने भरलेले असल्याचा दावा करत ठेकेदारांकडून मोठ्या प्रमाणावर कामात हलगर्जीपणा होत असल्याचा आरोप मनसेने केला आहे. नालेसफाई योग्यपद्धतीने झाली नाही तर, तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मनसेने दिला आहे.

पावसाळ्यात नाले तुंबून आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी ठाणे महापालिका प्रशासन पावसाळ्यापूर्वी प्रभाग समितीनिहाय नालेसफाईची कामे करते. यासाठी संबंधित प्रभाग अधिकारी आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून देखरेख केली जाते. असे असले तरी यंदा इंदिरा नगर, लोकमान्य नगर, सावरकर नगर, गांधीनगर, शास्त्रीनगर, माजीवाडा, घोडबंदर रोड यांसारख्या भागातील नाले अजूनही कचऱ्याने भरलेले आहेत, असा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जनहित व विधी विभाग ठाणे शहर अध्यक्ष स्वप्नील महिंद्रकर यांनी केला आहे. के विला परिसरात पहिल्याच पावसात मुख्य नाला तुंबल्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आणि नागरिकांना त्रास सहन करावा लागला. अशाच प्रकारची परिस्थिती शहरातील इतर भागांमध्ये उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

महापालिकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, नालेसफाई करताना "डिसिल्टिंग" पद्धतीचा वापर करून संपूर्ण नाल्याची सफाई करणे बंधनकारक आहे. तसेच सफाईनंतरचा गाळ आणि कचरा तात्काळ कचराभूमीवर हलवणे आवश्यक असताना, अनेक ठिकाणी तो नाल्याच्या कडेला किंवा पुन्हा नाल्याच्या आतच ढकलून ठेवण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. महापालिका प्रशासन दरवर्षी नालेसफाईसाठी नवीन योजना आणि तंत्रज्ञान वापरण्याचा प्रयत्न करत असले, तरी ठेकेदारांकडून ही कामे केवळ कागदावर दाखवली जात असल्याचा आरोप महिंद्रकर यांनी केला आहे.

ठाणेकर नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने नालेसफाई अत्यंत महत्त्वाची असून महापालिका प्रशासन आणि ठेकेदार यांच्याकडून प्रामाणिक आणि पारदर्शक काम होणे अपेक्षित आहे. अन्यथा, पावसाळ्यात शहर पुन्हा एकदा जलमय होण्याचा धोका आहे, अशी भितीही त्यांनी व्यक्त केली आहे.

## उल्हासनगर खड्ड्यात पडून एक व्यक्ती गंभीर जखमी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगरः** गेल्या काही महिन्यात रस्त्यावर पडलेले खड्डे, खोदकामाच्या ठिकाणी सुरक्षा साधनांचा अभाव यामुळे दोन जणांना आपला जीव गमवावा लागला असून अनेक जण जखमी झाले आहेत. ही खड्ड्यात पडून दुखापत होण्याची मालिका सुरूच असून उल्हासनगर शहराच्या कॅम्प चार भागात अशाच एका घटनेत एक व्यक्ती गंभीर जखमी झाली आहे. सध्या या व्यक्तीवर कळव्याच्या शासकीय रूग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र रस्त्यावर तयार झालेले खड्डे आणि खोदकाम आता नागरिकांच्या जीवावर उठू लागल्याचे चित्र आहे.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१

### आपत्कालीन खानपान कक्ष/सचिव कार्यालय

**निविदा सूचना क्रमांक ०२ / २०२५-२०२६ (दुसरी मागणी)**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्था २०२५-२०२६ च्या अनुषंगाने आपत्कालीन परिस्थितीत खानपान सेवा पुरविणेसाठी "ई" टेंडर प्रणालीद्वारे बी-२ नमुन्यामध्ये निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा इसारा रक्कम | कालावधी | निविदा फॉर्म किमंत (१८% GST सह) |
|---|---|---|---|---|
| ०१ | आपत्कालीन परिस्थितीत खानपान सेवा पुरविणे | रु. १६,०००/- | ०१ वर्ष | रु. ३५४०/- |

- इच्छुक ठेकेदारांनी / संस्थांनी महाराष्ट्र शासनाच्या निविदेबाबतची संपूर्ण माहिती www. Mahatenders. gov.in या संकेत स्थळावरुन ही निविदा खरेदी करुन भरता येईल.
- निविदा अर्जाची विक्री दि.२२/०५/२०२५ ते दि.२८/०५/२०२५ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यत सुरु राहील,
- निविदा भरण्याची मुदत दि. २२/०५/२०२५ ते दि.२८/०५/२०२५ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यत राहील.
- निविदा दि. २८/०५/२०२५ रोजी, सायं. ४.०० वाजता नागरी सुविधा केंद्रातील "ई" टेंडरिंग विभागात उघडण्यात येतील.
- नागरी सुविधा केंद्रातील "ई" टेंडरिंग विभागात उपस्थित निविदाधारक किंवा त्यांचे प्रतिनधी यांचे समक्ष निविदा उघडण्यात येतील.
- एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार मा.आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखून ठेवले आहेत.

जावक क्रमांक :
कडोंमपा/जसवि/मुका/१४३
दिनांक : २१/०५/२०२५

सही/-
(किशोर शेळके)
महापालिका सचिव,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका.

# डोंबिवली शहरात तेज ज्ञान रथ संकल्पनेला प्रतिसाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** शहरात संपूर्ण दिवस विविध वैचारिक, प्रबोधनात्मक व भक्तिमय आणि आनंद मिळवून देणाऱ्या पुस्तकांचे फिरते प्रदर्शन नुकतेच आयोजित करण्यात आले होते. या पुस्तक प्रदर्शनाला व विक्रीला डोंबिवलीकरांकडून प्रतिसाद मिळाला. तेज ज्ञान फाउंडेशन पुणे ही आध्यात्मिक संस्था असून मानवाचा शारीरिक, मानसिक, सामाजिक, आर्थिक आणि अध्यात्मिक विकासासाठी गेली २५ वर्ष ही संस्था कार्यरत आहे. तेज ग्रंथ हे सर्व सुजान नागरिक व वाचकांपर्यंत पोहोचण्यासाठी संपूर्ण भारत देशात आणि जगभर पुस्तकाची व्हॅन तेज ज्ञान रथ हा उपक्रम राबवण्यात येत आहे.



शहरातील ज्ञान ध्यान केंद्राच्या माध्यमातून तेजसेवकांकडून याचा प्रसार करण्यासाठी तेज ज्ञान रथाचे आयोजन करण्यात आले. हा प्रयत्न डोंबिवली शहरामध्ये दिवसभरासाठी वेगवेगळ्या ठिकाणी करण्यात आला. या प्रसंगी डोंबिवलीतील काही मान्यवर प्रतिष्ठित मंडळी मुकुंद भोईर, विजया भोईर तसेच जयकृष्ण सप्तर्षि व मधुकर कुलकर्णी हे तेज ज्ञान रथाच्या स्वागत समारंभासाठी उपस्थित होते. वाचनीय व व्यक्तिमत्व विकासासाठी उपयुक्त असणाऱ्या ग्रंथांना डोंबिवली शहरातील लोकांकडून मागणी झाली. डोंबिवलीच्या तेज ज्ञान फाऊंडेशनच्या तेजसेवकांना तेज ज्ञान रथ ही संकल्पना यशस्वी करण्यासाठी योगदान मिळाले.

# आरटीई' प्रवेश : प्रतीक्षा यादी टप्पा ४ प्रवेश फेरी सुरु

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे : दि. 21 -** जिल्ह्यातील बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार, दरवर्षीप्रमाणे २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. दि. २१, मे २०२५ रोजी प्रतिक्षा यादी टप्पा क्र. ०४ मधील निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रवेश प्रक्रियाची मुदत दि. २० मे, २०२५ ते २९ मे, २०२५ पर्यंत देण्यात आली आहे. निवड झालेल्या




यादीतील विद्यार्थ्यांच्या पालकांना SMS पाटविण्यात येत आहे. प्रतिक्षा यादीतील बालकांचे पालकांना शाळेच्या रिक्त जागेनुसार SMS पाठविण्यात येणार असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली आहे.

पालकांनी केवळ SMS वर अवलंबून न राहता RTE PORTAL वरील 'अर्जाची स्थिती' या टॅबवर आपल्या बालकांचा अर्ज क्रमांक टाकून अर्जाची स्थिती पहावी, तसेच वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे अवलोकन करावे. प्रतिक्षा यादीतील बालकांच्या पालकांनी अलोटमेंट लेटर व आवश्यक कागदपत्रे घेऊन विहित मुदतीत नजिकच्या पडताळणी केंद्रावर जाऊन पडताळणी समितीकडून दि. २९ मे, २०२५ रोजीपर्यंत कागदपत्रांची तपासणी करून आपल्या बालकांचा ऑनलाईन प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी केले आहे.

ठाणे जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती व महानगर पालिका अंतर्गत एकूण ६२७ पात्र शाळा असून एकूण ११ हजार ३२० रिक्त जागा उपलब्ध होते व आतापर्यंत ८ हजार ४९६ प्रवेश झाले आहेत. प्रतिक्षा यादी टप्पा क्र. ०४ मधील निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

## तेरा वर्षांनंतरही
# पनवेल तालुक्यातील गावपाड्याना भरवशाची वीज नाही

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**पनवेल :** जेएनपीटी बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, नवीन विस्तारीत तळोजा औद्योगिक क्षेत्र यामुळे पनवेल हे नवीन उद्योगकेंद्र बनत असताना अजूनही ग्रामीण पनवेलच्या ५० गावे आणि २५ वाडे व पाड्यांवर वीज व्यवस्थेचा पुरता फज्जा उडालेला आहे. या परिसरात दिवसातून दोन ते तीन वेळा विजेचा लपंडाव सुरू असतो. वीज महावितरण कंपनीने मागील १३ वर्षांपासून नेरे येथे उपकेंद्र उभारणीचे काम हाती घेतले आहे. मात्र ग्रामीण भागातील वीज यंत्रणेच्या सुधारणेला फारसे प्राधान्य महावितरणच्या 'प्रकाशगडा वरील वरिष्ठ अधिकारी देत नसल्याने पनवेलकरांवर बेभरवशाच्या विजेवर राहण्याची वेळ आली आहे.

पनवेल व उरण परिसरात मागील चार वर्षांत तब्बल दोन लाख वीज ग्राहक वाढले आहेत. सध्या साडेपाच लाख घरगुती आणि ६०० औद्योगिक वापरकर्ते वीज ग्राहक पनवेलमध्ये आहेत. महिन्याला सुमारे अडीचशे कोटी रुपयांचे वीज शुल्क महावितरण कंपनीच्या तिजोरीत जमा होते. वेगवेगळया ९ फीडरवरुन पनवेलच्या वीज महावितरण कंपनीचा कारभार केला जातो.

गव्हाण, पारगाव, तळोजा, नावडे, नेरे, पनवेल, कळंबोली, खारघर आणि उरण अशा फीडरवरुन वीज उपकेंद्रातून ग्राहकांना पुरवठा केला जातो. यातील नेरे फिडरवर जे २८ हजार वीजग्राहक अवलंबून आहेत त्यांना सध्या उपकेंद्र सुरू न झाल्याचा मोठा फटका त्यांना सहन करावा लागत आहे. सुमारे ८ कोटी रुपये खर्च करुन नेरे येथील महालक्ष्मी नगर येथे उपकेंद्राला जागा उपलब्ध झाली आहे. परंतु तीनवेळा कंत्राटदार बदलूनही हे काम अद्याप पूर्ण झालेले नाही.

सध्या हे काम एस.टी. इलेक्ट्रीकल कंपनीला दिले आहे. हे काम पूर्ण करण्याची अंतिम मुदतवाढ संबंधित कंपनीला दिल्याचे महावितरण कंपनीच्या स्थानिक अधिकाऱ्यांकडून समजते. मात्र प्रत्यक्षात हे उपकेंद्र कधी सुरू होईल याबाबत अजूनही अनिश्चितता आहे. एस.टी. इलेक्ट्रीकल्स कंपनीचे संजय तिवारी यांना विचारल्यावर ते निधी अभावी काम रखडल्याची सबब देतात. मात्र महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना याबाबत विचारल्यावर असे काही नसल्याचे उत्तर अधिकाऱ्यांकडून मिळते. १० एमव्हीए क्षमतेचे हे उपकेंद्र आहे. या उपकेंद्राला पोदी ते नेरे (महालक्ष्मीनगर) या पल्यावरुन दोन वीज वाहिन्या भूमिगत पद्धतीने उपकेंद्रापर्यंत आणण्याचे काम पूर्ण झाले आहे. परंतू अजूनही उपकेंद्रातील रोहित्र तपासणीचे काम पूर्ण न झाल्याने येथे रोहित्र सुरू झालेला नाही.

दरम्यान, याबाबत वीज महावितरण कंपनीचे मुख्य अभियंता संजय पाटील यांच्याकडे याविषयी संपर्क साधल्यावर त्यांनी नुकताच पदभार स्वीकारल्याचे सांगत रखडलेल्या वीज उपकेंद्राची माहिती घेतल्याचे सांगितले. तसेच पनवेल (नेरे) येथील उपकेंद्राच्या कामाच्या सद्यस्थितीची पाहणी ते स्वतः करणार असल्याचे सुद्धा त्यांनी सांगितले.

## कॅन्सर ग्रस्त रुग्णाच्या मदत निधीसाठी
# आचार्य अत्रे रंगमंदिरात 'आशुक माशूक' कार्यक्रमाचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** दि. २७ मे २०२५ रोजी दुपारी ४ वाजता कल्याण पश्चिम येथील आचार्य अत्रे रंगमंदिर या ठिकाणी कॅन्सर ग्रस्त रुग्णाच्या मदत निधीसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अनेक मान्यवर, कलाकार, प्रेक्षक यांच्या उपस्थितीत कार्यक्रम सादर होणार आहे.

महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकप्रिय लोककला लावणी आहे. या लावणीचा आज देशविदेशात मोठा जाणकार प्रेक्षक वर्ग आहे. लोककलांचा उद्देशच मुळात लोकांना, समुहाला एकत्र आणणे हा आहे. लोककलांचा समाजप्रबोधनासाठी

जनजागृतीसाठी प्रभावीपणे वापर केला जातो. अशाच सामाजिक भूमिकेतून कॅन्सर ग्रस्त रुग्णाच्या मदत निधीसाठी जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई यांच्या माध्यमातून सुरेखा कलामंच निर्मित आशुक माशूक* या लाईव्ह लावणीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर प्रथमच निर्मिती क्षेत्रात पदार्पण करीत आहेत. याचे लेखन प्रा. हरेंद्र सोष्टे यांनी केले.कार्यक्रमाची संकल्पना, दिग्दर्शन आणि नृत्यदिग्दर्शन प्रा. महेश थोरात यांचे आहे. सहनृत्यदिग्दर्शन यामिनी रागा करीत आहे. पारंपरिकतेनुसार कार्यक्रमाचे सादरीकरण होणार आहे. पारंपरिक लावण्यांबरोबरच समकालीन लावण्यांचाही यात समावेश आहे. आघाडीचे नामवंत कलाकार यात आपली कला ,नृत्य , अभिनय ,गायन, वादन, निवेदन,




बतावणी सादर करणार आहेत. पारंपरिक लावणी आणि सोज्वळ अदाकारी अशी ओळख असणारी यामिनी रागा, चैन्नई सुपरफास्ट लावण्यवती अंबिका पुजारी, लावण्यतारका धनश्री हजारे,नाट्य अभिनेत्री लोककलेचा अभ्यास करणारी सुजाता किरण आणि नृत्यांगना सिने नाट्य अभिनेत्री धनश्री दळवी यांच्या दिलखेचक अदाकारी, सौंदर्याने नटलेल्या बहारदार लावणीं कार्यक्रमाचे आकर्षण आहे. सोबतच मराठी विषयाचे प्राध्यापक आणि लोककलेचे अभ्यासक प्रा.महेश थोरात यांच्या पारंपरिक लावणीचा नजराणा प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे.

यासाठी अमोल - परेश यांचे अफलातून संगीत, लावणी महासंघाचे संस्थापक श्री. संतोष लिंबोरे यांचे भारदस्त निवेदन, गायिका नम्रता वेस्विकर यांच्या आवाजातील लावण्या याचा आस्वाद कार्यक्रमातून घेता येणार आहे. सोंगाड्याच्या भूमिकेत विनोद पाटील तर सहनृत्यागंना म्हणून जीवनदीप महाविद्यालयातील विद्यार्थ्यीनी जुईली पवार, राजनंदिनी लांजेवार, प्रतिज्ञा राऊळ, वैष्णवी मैस्त्री, काजळ धुमाळ यांचा सहभाग आहे. या माध्यमातून

या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त लोकांनी आस्वाद घ्यावा आणि कॅन्सर ग्रस्त रुग्णाच्या मदत निधीसाठी आर्थिक मदत करावी यासाठी आव्हान करण्यात येत आहे. (तिकिटासाठी , मदतनिधी साठी संपर्क - 9004901135 ,9372267543) या कार्यक्रमासाठी अनेक मान्यवर, कलाकार मंडळी, सामाजिक कार्यकर्ते यांची उपस्थिती असणार आहे.



कल्याण तालुका सार्वजनिक बांधकाम वभाग उपविभागीय अधिकारी या पदावर श्री. मदन हिरवे यांनी नुकताच पदभार स्वीकारला यावेळी त्यांना भेटून शुभेच्छा देताना दै. ठाणे जीवनदीप वार्ताचे संपादक रवींद्र घोडविंदे.

# प्रा.प्रवीण भालेराव यांना वन्यजीव मित्र पुरस्कार




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मोहन गारे (गोवेली)** जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गोवेली येथील वाणिज्य विभागातील प्राध्यापक प्रवीण भालेराव यांना दि. 20 मे रोजी जागतिक मधमाशी दिनानिमित्त खादी आणि ग्रामोद्योग आयोग मुंबई अंतर्गत सेंट्रल बी रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (CBRTI)पुणे यांच्या वतीने मधमाशी संरक्षण संवर्धन आणि जनजागृती आयोजन कार्यक्रमात मित्र पुरस्कार देऊन गौरवण्यात आले . हा पुरस्कार प्राणी मित्र म्हणून निसर्ग संवर्धन आणि आपत्ती व्यवस्थापनामध्ये विशेष योगदान देणाऱ्या महाराष्ट्रातील 15 प्राणी मित्रांना देण्यात आला.यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे. प्राचार्य डॉ.के.बी कोरे प्राचार्य डॉ.अशोक वाघ उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

| | |
|---|---|
| X | https://x.com/@Jeevandeepvarta |
| Facebook | https://www.facebook.com/jeevandeepnews |
| Instagram | https://www.instagram.com/thane_jeevandeep |
| Web | https://jeevandeepvarta.com |

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science, B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.M.S., B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. HISTORY, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY, M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
7021995158

# पोलीस उपनिरीक्षक दीपक घुगे यांचा गौरव



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे शहर गुन्हे शाखा घटक 01चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दीपक बिजलाबाई निवृत्ती घुगे व तपास पथक यांनी वर्तक नगर पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्याचा तपास करताना एकाच रात्रीत वर्तकनगर, राबोडी, नौपाडा परिसरात महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र जबरीने चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास अटक करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तसेच ठाणे पोलीस आयुक्तालयातील 09 सोनसाखळी जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणून त्यात जबरी चोरीस नेलेल्या 10 लाख रुपये किमतीचे 100 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा मुद्देमाल हस्तगत केला. त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल ठाणे शहर आयुक्तांलयाकडून दीपक घुगे यांना सदरक्षणाय खलनिग्रहणाय प्रशस्तीपत्रक देऊन त्यांनी केलेल्या कारवाईचा गौरव केला. दीपक घुगे यांनी केलेल्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# दिवा शहरात नालेसफाईत हलगर्जीपणा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे: दिवा शहरात दरवर्षी पावसाळयात नालेसफाईत हलगर्जीपणा होत असून यावर्षीही होणारी नालेसफाई ही दिखाव्यासाठी केली जात असून नाल्यातील खोलवरील गाळ प्रत्यक्ष काढला जात नसल्याचा आरोप ठाकरेंच्या शिवसेनेच्या दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील यांनी केला आहे. पालिका आयुक्तांनी दिवा शहरातील नालेसफाईचा प्रत्यक्ष पाहणी दौरा करावा, अशी मागणीच त्यांनी या निमित्ताने केली आहे.

दिवा शहरात दरवर्षी नालेसफाई नीट न झाल्याने अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचते. त्याचबरोबर रस्त्यांवर पाणी साचल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. आधीच दिवा शहरात अरुंद नाले असून नाल्यांच्या ठिकाणीच वस्ती दाटी-वाटीने वसलेली आहे. त्यात नालेसफाई नीट होत नसल्याने नागरिकांना आगामी पावसाळयात याचा फटका बसण्याची शक्यता आहे. अंतर्गत नाले साफ न केल्याने बैठ्या घरांमध्ये पाणी शिरल्याने अनेकांना पावसाळयात समस्यांचा सामना करावा लागतो. ही परिस्थिती लक्षात घेऊन दिवा शहरातील सर्व महत्त्वाचे नाले हे पूर्णपणे साफ करणे आवश्यक आहे. मात्र महापालिकेचे संबंधित ठेकेदार हलगर्जीपणा करत असून वरवरचा कचरा काढून आतील गाळ काढण्यास चालढकल केली जात असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या महिला संघटिका ज्योती पाटील यांनी केला आहे. ज्या ठिकाणी वरवरचा प्लास्टिक कचरा काढून ठेवण्यात आला आहे, तो उचलला न गेल्याने पावसामुळे हा कचरा पुन्हा त्याच नाल्यात जाण्याची शक्यता आहे. एकंदरी दिव्यातील नालेसफाईमध्ये पालिका अधिकारी व संबंधित ठेकेदार यांना नागरिकांच्या समस्यांशी देणं घेणं नाही अशीच परिस्थिती असल्याने दिवा शहरातील संपूर्ण नालेसफाईचा प्रत्यक्ष पाहणी दौरा पालिका आयुक्त यांनी करावा व सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांना या दौऱ्यात सहभागी करून घ्यावे, अशी मागणी या निमित्ताने ज्योती पाटील यांनी केली आहे. पालिका आयुक्तांच्या दौऱ्यामुळे दिव्यात होणाऱ्या नालेसफाईच्या हातसफाईकडे पालिक आयुक्तांचे लक्ष वेधता येईल असे ज्योती पाटील यांनी म्हटले आहे.

# मुरबाड तालुक्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचं थैमान

## वीटभट्टीच्या नुकसानाने वीट भट्टी मालक हवालदिल!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड(बाळासाहेब भालेराव) : मुरबाड तालुक्यातील ग्रामीण आदिवासी पट्टया तसेच मुरबाड शहर परिसरात गेली दहा ते बारा दिवस मोठ्या प्रमाणात अवकली पावसाने थैमान घातल्याने सर्वच ठिकाणी जन जीवन विस्कलित झाल्याचे चित्र दिसून येत आहे. तालुक्यात मंगळवारी संध्याकाळी चार वाजता तसेच संध्याकाळी सात वाजता पुन्हा रात्री दहा वागण्याच्या सुमारास जोरदार विजेच्या कडकडासह जोरदार पाऊस बरसला या वादली वाऱ्यासच्या पावसामुळे तालुक्यातील भादाणे येथील ७ घरावरील तर तलाठी सजा भुवन हद्दीतील जवळपास २० असे मिळून २७ घरावरील छपरे उडून मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती तहसील कार्यालयातील मिळाली आहे. याबाबतची माहिती मिळताच तसेच कार्याद्वारे तलाठी सर्कल मंडळ तसेच कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन नुकसान झालेल्या घरांची पाहणी केली आहे. तसेच दुसऱ्यांदा वादळी वाऱ्यासच्या पावसामुळे वीट भट्टी वाल्यांचे मोठे नुकसान झाले आहे तरीही नुकसान झालेल्या वीटभट्टीचे पंचनामा करण्याची मागणी वीट भट्टीचे मालक दीपक धुमाळ यांनी केली आहे.



मंगळवारी संध्याकाळी झालेल्या वादळी पावसामुळे मुरबाड तालुक्यात उच्च दाब वाहिनीचे जवळपास १३ विजेचे खांब व २७ लघुदाब वाहिनीचे खांब कोसळले आहेत, तसेच मोठ मोठी झाडे पडल्यामुळे ५० ते ६० ठिकाणी तारा तुटून पडल्या आहेत त्यामुळे मुरबाड तालुक्यातील जवळपास २७००० ग्राहकांचा विजपुरवठा बाधित झालेला होता. कर्मचारी व अधिकारी यांनी रात्री भर पावसात विज पुरवठा सुरळीत करण्यासाठी अथक परिश्रम घेऊन जवळपास २२००० ग्राहकाचा विजपुरवठा रात्रीच सुरळीत केला. सध्या पडलेले विजेचे खांब उभे करण्यासाठी ७ कंत्राटदार, ६० कामगार, कर्मचारी व अधिकारी सकाळपासून कार्यरत असून उर्वरित ग्राहकाचा विजपुरवठा सुरळीत करण्याचे काम सुरू आहे. बदलापूर विभागाचे महावितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता आनंद काटकर यांनी दिली आहे.

ग्रामीण भागात जवळपास २०तास वीज परवठा खंडित झाला होता त्यानंतर मुरबाड महावितरण कंपनीच्या टीमने सकाळी सात वाजल्यापासून सुरुवात करून युद्धपातळीवर काम केले त्यावेळी सकाळी ११ वाजता विद्युत पुरवठा सुरू झाल्याची माहिती मुरबाड महावितरण कंपनीचे प्रभारी उपअभियंता राजेंद्र शिर्के यांनी दिली आहे.

> संध्याकाळी चार वाजता, रात्री सात वाजता पुन्हा रात्री दहा वाजता, असे मिळून तीन वेळा वादळी वाऱ्यासह पाऊस मुरबाडला बरसला.मंगळवारी झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे मुरबाड भागात १३ विजेचे खांब पडले, तर ५० ते ६० ठिकाणी विद्युत तारा तुटून पडल्या. त्यामुळे २७००० ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित झाला होता, परंतु रात्रीच महावितरणाच्या टीमने अथक प्रयत्न करून २२००० ग्राहकांचा वीज पुरवठा रात्रीच सुरू केला. तसेच काही ठिकाणी विद्युत पोल पडले आहेत त्या ठिकाणी मुरबाड महावितरण कंपनी द्वारे युद्ध पातळीवर विद्युत पोल बसवण्याचे काम सुरू आहे.
>
> **– आनंद काटकर कार्यकारी अभियंता बदलापूर विभाग महावितरण कंपनी.**

या अवकाळी पावसामुळे तालुक्यातील लग्नसमारंभावर पाणीच पाणी फिरवल्याने वधू वर वधू वर मंडळीची दररोज संध्याकाळी तारांबळ उडाल्याचे पाहायला मिळत आहे.

अवकाळी पावसाने मे महिन्यात सुरुवात केल्याने जून महिन्यात पाऊस हे मे महिन्याच्या पावसावरून चित्र दिसून येत आहे. मंगळवारी संध्याकाळी चार वाजता वाजले वाऱ्याचे पाऊस पडला परंतु एक एक दीड तास पावसाने विश्रांती घेतल्यानंतर पुन्हा अवकाळी पावसाने सात वाजून ४५ मिनिटापर्यंत मोठ्या प्रमाणात विजयाच्या गडगडासह जोरदार पाऊस बरसला असल्याने तालुक्यात सर्वच ठिकाणी पाणीच पाणी झाल्याचे चित्र दिसून येत आहे. जास्त पाऊस पडल्याने बेडूक मामा बिलात न थांबता बाहेर येऊन द्राव द्राव आवाज देऊ लागला. त्यामुळे अक्षरशः तालुक्यात दहा ते बारा दिवस सतत पाऊस पडत असल्याने मोठ्या प्रमाणात रानमालावर रोहिटी उगवू लागली आहे. तसेच मुरबाड तालुक्याला वादळी वाऱ्यचा तिसऱ्यांदा फटका बसला आहे.

# पालघर जिल्ह्याला एमएच ६० नवीन ओळख




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई: आदिवासीबहुल जिल्हा असलेल्या पालघरला नवे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय मंजूर झाले असून आता पालघर जिल्ह्याला एमएच ६० ही नवीन परिवहन ओळख मिळाली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

ते पुढे म्हणाले की, ९ एप्रिल रोजी संपर्कमंत्री या नात्याने पालघर येथे झालेल्या लोकदरबारामध्ये लवकरच पालघरमधील नागरिकांसाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्यात येईल असे आश्वासन मी दिले होते. त्याची पूर्तता या निमित्ताने होत असून पालघर जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला यापुढे परिवहनविषयक कामासाठी वसई-विरारला जाण्याची आवश्यकता भासणार नाही. सहाजिकच त्यांचा वेळ, श्रम आणि पैशाची बचत होणार आहे.

पालघरला उपप्रादेशिक परिवहन कार्यालय मंजूर करण्यासाठी तातडीने कार्यवाही केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना पक्षाचे नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष आभार मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केले आहेत. या संदर्भातील शासन निर्णय लवकरच प्रसिद्ध होईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

# योगेंद्र बांगर यांना साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात मुरबाड तालुक्यात आघाडीवर असणारे इतिहास संशोधक, निसर्ग अभ्यासक, शिक्षक योगेंद्र बांगर यांना मुंबई येथे ख्यातनाम हुंडा विरोधी चळवळीच्या वतीने देण्यात येणारा मानाचा पुरस्कार विख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. विभूती पटेल यांच्या हस्ते १८मे २०२५रोजी प्रदान करण्यात आला. १०००/_रक्कम, मानधन, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह ,खादी सुताचा हार, श्रीफळ,२५ ग्रंथ, भेटवस्तू या सह लोकमान्य सेवा संघ, गोखले सभागृह विलेपार्ले येथे बांगर यांचा सन्मान करण्यात आला.

समाजसेविका लता नायक मुंबई, डॉ.मिलिंद भोई पुणे यांचाही विशेष सन्मान या कार्यक्रमात करण्यात आला.आजीबाई शाळा फांगणे, यासह अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात मुरबाड तालुक्यात ते आघाडीवर आहेत. मुरबाड इतिहास, माता भिमाई ,सिद्धगड बारा लढाया, शब्दांचे चांदणे, रानभाज्या , गुलाबी कातकरी वाडी ही त्यांची गाजलेली पुस्तके आहेत. आता पर्यंत नेहरू युवा केंद्र भारत सरकार जिल्हा युवा गौरव पुरस्कार, राज्यस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज वनश्री वृक्षमित्र पुरस्कार, महाराजा सयाजीराव गायकवाड बडोदा विद्यापीठ, गुजरात यांचा देशातून दिला जाणारा युगांतर पुरस्कार असे पन्नास हून अधिक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. साने गुरुजींचे विद्यार्थी समाजसेवक मामासाहेब कुलकर्णी यांच्या प्रेरणेने महा सचिव आशा ताई कुलकर्णी,अध्यक्ष जयप्रकाश. सावंत, उपाध्यक्ष प्रा.भारती उन्नी यांनी या प्रसंगी मेहनत घेतली. या सुयशासाठी योगेंद्र बांगर यांचे कौतुक होत असून आजीबाई शाळा फांगणे व सामाजिक स्तरातून अभिनंदन होत आहे.

# स्वच्छतादूतांकडून दंड आकारला जात असल्याने ठाकरेंच्या शिवसेनेने विचारला जाब

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : शहर स्वच्छते करता स्वच्छतादूत अर्थात क्लीन मार्शल पालिका प्रशासनाकडून नियुक्त केले आहेत. रस्त्यावर थुंकणे, घाण करणाऱ्या नागरिकांना क्लीन मार्शलकडून दंडात्मक कर आकराला जातो. मात्र ही कारवाई नसून नागरिकांना त्रास देत पैसे वसूल केले जातात असा आरोप ठाकरेंच्या शिवसेनेने केला आहे. काल मंगळवारी 20 तारखेला ठाकरेंच्या शिवसेनेने डोंबिवली पश्चिमेकडील स्टेशनबाहेरील क्लीन मार्शलला जाब विचारला.

नागरिकांच्या तक्रारी वरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील उपशहर प्रमुख श्याम चौगुले, राहुल चौधरी, विभाग प्रमुख प्रवीण विरकुड, प्रकाश कदम शाखा प्रमुख राकेश मोहिते, सुनिल पवार, आणि मंदार निकम यांनी मंगळवारी 20 तारखेला डोंबिवली पश्चिमेला नेहमीप्रमाणे कामावर असलेल्या क्लीन मार्शलना जाब विचारला. क्लीन मार्शलने काही नागरिकांना रस्त्यावर थुंकल्याचे म्हणत थांबून ठेवले होते. मात्र त्या नागरिकांनीही मनाई केल्यानंतर क्लीन मार्शल व त्याच्यात वाद सुरु होता. क्लीन मार्शलची दादागिरी डोंबिवलीकर सहन करणार नाही असे ठाकरेंच्या शिवसेनेने बजावून सांगितले. डोंबिवली पश्चिमेला स्टेशनबाहेर नागरिकांची रहदारी जास्त असते. स्टेशनबाहेर सुशोभिकरण केल्याने स्वच्छता राखणे आवश्यक आहे. मंगळवारी 20 तारखेला डोंबिवली पश्चिम स्टेशनबाहेरील परिसरात जर क्लीन मार्शलकडून नागरिकांना नाहक त्रास झाला असेल व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील पदाधिकाऱ्यांकडून तसा आरोप होत असेल तर त्या क्लीन मार्शल चौकशी करू. चौकशीत जर तो क्लीन मार्शल दोषी आढळल्यास त्याच्यावर कारवाई होईल असे याविषयी क्लीन मार्शल सुपरवायझर भरत ढोले यांनी सांगितले.

# भिवंडी महानगरपालिकेत घेतली दहशतवादी व हिंसाचार विरोधात प्रतिज्ञा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : शासन परिपत्रकामधील नमूद निर्देश व भिवंडी निजामपूर शहर महानगरपालि केच्या मा. प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर (भा. प्र. से.) यांच्या निर्देशानुसार आज माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचा स्मृति दिन असल्याने दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस म्हणून पाळण्यात आला असून महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके यांच्या शुभहस्ते माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर अतिरिक्त आयुक्त यांनी सर्व अधिकारी समवेत दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाची प्रतिज्ञा घेतली.

याप्रसंगी शहर अभियंता जमील पटेल,सहाय्यक आयुक्त सामान्य प्रशासन अनुराधा बाबर, विभाग प्रमुख सुधीर गुरव, मिलिंद पळसुले, प्रशांत संखे, दीपिका ठाकरे व इतर कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# रवींद्र घोडविंदे यांची मेष्टा शैक्षणिक संस्था चालक संघ ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष पदी निवड

**ठाणे जिल्हा मेष्टा शैक्षणिक संस्था संघाचे आध्यक्ष नरेश पवार यांनी ठाणे ग्रामीण च्या अध्यक्ष पदी नियुक्तीचे पत्र देण्यात आले, यावेळी नरेश पवार सर यांच्या समवेत कोकण विभाग मेष्टा चे आध्यक्ष गजानन पाटील उपस्थित होते ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील शैक्षणिक संस्था चालकांचे प्रश्न सोडविण्यासाठी व त्यांना सहकार्य करण्यासाठी प्रयत्न करावेत अशा सूचना नरेश पवार यांनी या प्रसंगी रवींद्र घोडविंदे यांना दिल्या यावेळी शिक्षक व प्राध्यापक उपस्थित होते.**




# गोवंशांची कत्तल करणा-या आरोपींना पेण पोलिसांनी केली अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : १५ डिसेंबर २०२४ रोजी सावरसई येथे गोवंशीय मास कत्तल करणाऱ्या मुख्य आरोपीला पेण पोलिसांकडून कोपरगाव, जिल्हा अहिल्यानगर येथून अटक करण्यात आली.

या बाबत सविस्तर वृत्त असे की, दिनांक १५ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ६:४४ वाजता पेण-खोपोली मार्गवरील सावरसई गावाच्या हद्दीत टाटा इंट्रा कंपनीच्या टेंम्पो क्रमांक एमएच ०५ एफजे १५११ मध्ये गोवंशीय मांस कत्तल करून, गांवशीय मांसाची वाहतुकीचा कोणताही परवाना नसताना गोवंशीय मांसाची वाहतुक करत असताना टेंम्पोचा टायर फुटल्याने सदरचा टेंम्पो मालासह टेम्पोचा चालक आणि इतर दोघे सदरील टेम्पो सोडुन पळुन गेले होते. यातील आरोपी अफसर मेहबुब कुरेशी, नजरूद्दीन निजामुद्दीन खान , साजिद लायक कुरेशी सर्व रा. कुर्ला, मुंबई यांना गुन्ह्यात अटक करण्यात आली होती. सदर गुन्हयाचा तपास सुरू असताना आरोपींनी सदरचे गोवंशीय मांस हे इसा कुरेशी रा. वैजापुर, जि. संभाजीनगर याचेकडुन आणले असल्याचे तपासत निष्पन्न झाले होते. गुन्हा घडल्यापासुन आरोपी इसा कुरेशी हा गेले ५ महिन्यापासुन फरार होता. आरोपी ईसा कुरेशी याचा वेळोवेळी शोध घेतला असता तो मिळुन येत नव्हता.सदर आरोपीत याचा तांत्रिक विश्लेषण करून उपविभागीय पोलीस अधिकारी पेण गजानन टोंम्पे यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक संदिप बागुल पेण पोलीस ठाणे यांच्या सुचनांनुसार गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे अधिकारी व अंमलदार हे करीत होते.

गोपनिय माहितीच्या आधारे गुन्हे प्रकटीकरण शाखा पेण यांनी शोध घेवुन फरार आरोपी इसा युसुफ कुरेशी वय ४० वर्षे रा. मांगवाडा खानगल्ली, शेरेपंजाब हॉटेलच्या पाठीमागे, वैजापुर, जि. संभाजीनगर हा कोपरगांव जि. अहिल्यानगर येथील मार्केटमध्ये आला असल्याची बातमी मिळाली त्यास सापळा रचुन ताब्यात घेवुन १९ मे २०२५ रोजी अटक केली. सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर अशाप्रकारचे अनेक गुन्हे दाखल आहेत.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024